# पतसंस्थांमधील सभासदांच्या ठेवी हे कर्जच आहे

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ हा सहकारी कायदा महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना लागू आहे. नागरी सहकारी पतसंस्था तसेच बिगर शेती ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्था यांचेबाबतीत वरील सहकारी कायद्यात पतसंस्थांनी सभासदांकडून स्वीकारवयाच्या ठेवी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घ्यावयाची कर्जाची मर्यादा यासाठी स्पष्ट तरतूद केलेली आहे.



राज्यातील मोठ्या प्रमाणात पतसंस्थांचा समज असा आहे की, आपली पतसंस्था सभासदांकडून हव्या तेवढ्या ठेवींच्या रकमा स्वीकारु शकतात, व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेतले नसेल तर ' बाहेरील कर्जे' याचे उत्तर लिहिताना **'निरंक '** असे स्पष्टपणे जाहीर करतात. परंतु ह्या अग्रलेखात पतसंस्थांनी स्वीकारावयाच्या ठेवी व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज तसेच बाहेरुन कर्ज उभारण्याची मर्यादा, म्हणजेच कर्जे घेण्यावर निर्बंध ह्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सहकार कायद्यातील अधिनियम ४३ व नियम ३५, ३६ व ३७ ला अधीन राहून पतसंस्थांना मार्गदर्शन व सावध राहण्यासाठी विश्लेषण करीत आहोत.

पतसंस्थांनी सभासदांकडून ठेवी स्वीकारणे, किंवा ठेवी गोळा करणे हे सुद्धा पतसंस्थांनी सहकारी कायद्यानुसार उभारलेले कर्जच आहे. एखादी पतसंस्था सभासदाकडून किती रुपयांच्या ठेवी स्वीकारु शकते, आणि/ किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून किती रकमेची कर्जे घेऊ शकते, यासाठी नियम ३५ मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. नागरी सहकारी पतसंस्था सहकारी निबंधकाची पूर्व मंजुरी घेतल्याशिवाय आपले भरणा झालेले भागभांडवल, (म्हणजेच वसुल भागभांडवल) संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोट्याच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण १० पटीपेक्षा अधिक होईल, इतक्या रकमेची जबाबदारी पत्करणार नाहीत. म्हणजेच **'स्वनिधीच्या ( संचित तोट्याच्या रकमा वजा करुन ) १० पटीपेक्षा जास्त रकमेची म्हणजेच ती रक्कम सभासदांकडून ठेवी असोत आणि/ किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज असो, या दोघांची बेरीज स्वनिधीच्या १०**

**पटीपेक्षा जास्त असणार नाही.'** उदाहरणादाखल एका पतसंस्थेची माहिती खालीलप्रमाणे देत आहे :-

------------------ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,

| | |
|---|---|
| वसुल भागभांडवल | रु. ६० लाख |
| राखीव निधी | रु. १२ लाख |
| इमारत निधी | रु. ८ लाख |
| | ----------- |
| एकूण स्वनिधी | रु. ८० लाख |
| | ------------ |

म्हणजेच ह्या पतसंस्थेचा स्वनिधी रु. ८० लाख आहे. व ह्या पतसंस्थेस संचित तोटा नाही, म्हणून या पतसंस्थेस सभासदांकडून स्वीकारावयाच्या ठेवींच्या रकमा आणि/किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घ्यावयाचे कर्ज ह्या दोघांची बेरीज करुन रक्कम स्वनिधीच्या १० पट, म्हणजेच रु. ८० लाखांच्या १० पट, म्हणजेच ८ कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी सभासदांकडून स्वीकारु शकत नाही. म्हणजेच ही पतसंस्था सभासदांकडून ८ कोटीपेक्षा एक नयापैसा सुद्धा सभासदांकडून ठेवी स्वीकारु शकत नाही. तसेच जर ह्या पतसंस्थेच्या ठेवी ७.५ कोटीच्या असतील तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ही पतसंस्था जास्तीत जास्त रु. ५० लाख कर्ज घेऊ शकते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सुद्धा या नियम ३५ नुसार पतसंस्थांना स्वनिधीच्या १० पटीपेक्षा जास्त रकमेची कुठल्याही परिस्थितीत उचल देऊ शकत नाही.

उपरोक्त उदाहरणावरुन लक्षात येईल की, पतसंस्थेवर कर्ज आहे का? किंवा पतसंस्थेने बाहेरील कर्ज उभारले आहे का? याचे उत्तर देताना पतसंस्थांची बाहेरुन कर्ज उभारण्याची मर्यादा स्वनिधीच्या १० पटच असल्यामुळे सभासदांकडून स्वीकारलेल्या ठेवी हे सुद्धा पतसंस्थेवर एक प्रकारचे कर्जच आहे. **ठेवीवर सभासदांना व्याज देणे आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन मुद्दल व व्याज परत करणे या दोन्हीही गोष्टी 'कर्ज' या सदरामध्ये येतात .** त्यामुळे स्वनिधीच्या १० पटीपर्यंतच पतसंस्था ठेवी स्वीकारु शकतात. ही कायद्यातील तरतूद पतसंस्थांच्या आर्थिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आणि ही मर्यादा किंवा निर्बंध तोडून ज्या पतसंस्था सभासदांकडून ठेवी स्वीकारतात, त्या पतसंस्था केव्हाही आर्थिक अडचणीत येऊ शकतात. किंबहुना

सहकारी निबंधक/शासकीय लेखापरिक्षक याबाबतीत स्पष्टपणे आक्षेप घेऊन त्या पतसंस्थेवर सहकारी कायद्यानुसार कारवाई करण्यास क्रमपात्र ठरतात. कारण वरील उदाहरणाप्रमाणे त्या पतसंस्थेने ८ कोटी रुपयांच्या ठेवी स्वीकारण्याच्या ऐवजी जर १० कोटी रुपयांच्या ठेवी सभासदांकडून स्वीकारल्या, तर या पतसंस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासक नेमून सहकारी कायद्याप्रमाणे सहकारी निबंधक कारवाई करु शकतात. किंबहुना ती निबंधकाची कायद्याने जबाबदारी आहे. तसेच सहकारी कायदा तोडून असे कृत्य करणे व संस्था लाखो/करोडो रुपयांची उलाढाल करुन जरी लेखापरिक्षणाच्या दृष्टीने 'अ' वर्गात असेल व संस्था नफ्यातही असेल, तसेच सभासदांना योग्य तो लाभांष सद्धा देत असेल, तरीसुद्धा नियम ३५ चे उल्लंघन पतंसस्थेला अडचणीचे ठरु शकते.

सहकारी कायद्यामध्ये पतसंस्थांना स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेची जबाबदारी ठेवी आणि/किंवा  जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्जाची मर्यादा वाढवून मिळू शकते, त्यासाठी सहकारी कायद्यामध्ये जी तरतूद आहे व ज्यांना असे अधिकार प्रदान केलेले आहेत, ते संबंधित सक्षम अधिकारी/मंत्री प्राप्त अधिकारानुसार यात वाढकरु शकतात. परंतु ह्याबाबतीत सुद्धा कायद्याचाच आधार घ्यावा लागतो. नियम ३५ चे उल्लंघन करण्याचे अधिकार सहकारी कायद्यामध्ये कोणालाही दिलेले नाहीत. त्यामुळे पतसंस्थांनी स्वीकारावयाच्या ठेवी आणि/किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घ्यावयाचे कर्ज यास स्पष्टपणे निर्बंध घातल्यामुळे पतसंस्थांचा हा आर्थिक ढाचा कायद्यानुसार स्थिरस्थावर राहू शकतो. स्वनिधीच्या १० पटीपेक्षा जास्त कर्जाऊ रक्कम, म्हणजेच ठेवी आणि/किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज घेऊ शकत नाही. म्हणजेच पतसंस्थांनी जाास्तीत जास्त किती रुपयांच्या ठेवी गोळा करायच्या याबद्दल वरीलप्रमाणे सहकारी कायद्यात तरतूद केलेली आहे. थोडक्यात सभासदांकडून स्वीकारलेल्या ठेवी **हे सुद्धा कर्जच आहे.** व हे कर्ज म्हणजेच ह्या ठेवींच्या मूळ रकमा व्याजासहीत दिलेल्या मुदतीत ठरलेल्या व्याजदरात सभासदांना परत करावयाच्या असतात. जसे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्ज मुद्दलाची रक्कम व्याजासह ठरलेल्या मुदतीत, ठरलेल्या व्याजदारात परत करावयाची असते.

नियम ३५ मध्ये असेही स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे की, कोणत्याही सहकारी संस्थेस ठेवीचा स्वीकार करुन किंवा रकमा कर्जाऊ घेऊन स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेची जबाबदारी पत्करता येईल. परंतु उक्त मर्यादेपेक्षा अधिक अशी ती कोणतीही रक्कम त्या संस्थेस ठेव म्हणून मिळाली असेल किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कर्ज घेतले असेल, त्या रकमेचा संस्था

आपल्या व्यवहारात उपयोग करणार नाही. आणि अशी रक्कम ती संस्था सरकारी तारण पत्रात गुंतविल, आणि अशी तारणपत्रे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेत आणि इतर सहकारी बँकेच्या बाबतीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवींना अशा तारण पत्रावर कोणतीही संस्था रकमा कर्जाऊ घेणार नाहीत. म्हणजेच पतसंस्थेने स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रक्कम ठेव म्हणून स्वीकारली तर त्याचा उपयोग सभासदांना कर्ज देण्यासाठी होऊ शकत नाही, किंवा त्याची अन्यत्र गुंतवणूक सुद्धा करु शकत नाही. तसेच ह्या अतिरिक्त रकमेतून स्थावर मालमत्ता सुद्धा उभारु शकत नाही, व सरकारी/निमसरकारी देणे सुद्धा या रकमेतून देऊ शकत नाही.

नियम ३६ व ३७ मध्ये अनुक्रमे महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व भूविकास बँक यांना ही स्वनिधीच्या १० पटीची अट मात्र लागू नसून ती अनुक्रमे १५ पट व २० पट आहे. म्हणजेच नियम ३५ चे उल्लंघन हे पतसंस्थेची गुणवत्ता बिघडावयास फार मोठे कारण आहे. कलम ४३ मध्ये म्हटल्याप्रमाणे भारतीय रिझर्व्ह बँकेने व नाबार्डने वेळोवेळी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाला अधीन राहून सहकारी पतसंरचना संस्थेला वेगळी तरतूद केलेली आहे. आणि त्या तरतुदी पतसंस्थांना लागू नाहीत. म्हणजेच ते सूत्र पतसंस्थांसाठी सहकार कायद्यात समाविष्ट नाही.

एकंदरीत, नागरी सहकारी पतसंस्थांनी स्वनिधीच्या १० पटीपेक्षा जास्त रकमा कुठल्याही परिस्थितीमध्ये ठेवरुपाने आणि/किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊ नये. कारण स्वनिधीच्या १० पटीमध्ये वाढकरुन घेण्यासाठी जे करावे लागते, व जरी ती मर्यादा वाढवून मिळाली तरी पतसंस्थेचा आर्थिक ढाचा ढासळून ठेवीदारांच्या ठेवी असुरक्षित होऊ शकतात. व पतसंस्थेचा एकंदरीत कारभार अडचणीत येण्यासाठी मोठ्या प्रमाणात सुरुवात होऊ शकते. म्हणून ह्यापासून पतसंस्थांनी सावध राहणे आणि सहकारी निबंधक व लेखापरिक्षक यांच्यापासून बचाव करुन ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवण्यासाठी नियम ३५ चे पालन करावे, असे या निमित्ताने माहितीसाठी व पतसंस्थांच्या सबलीकरणासाठी निदर्शनास आणून देत आहोत.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**